# महाराष्ट्र शासन
## राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई
**8 वा मजला, न्यू एक्सलसिअर इमारत, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१**

**ई-मेल** : maharashtra.cetcell@gmail.com **दूरध्वनी क्र.** ०२२-२२०१६१५९. **वेबसाईट** :www.mahacet.org


क्र.रासाप्रपक / कृषीप्र-१३२१/शै.व. २१-२२/**०३०.** दि. ०६ जानेवारी,२०२२

**परिपत्रक**

**विषयः- कृषी विद्यापीठांतर्गत पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया २०२१-२२.
पदवी अभ्यासक्रमांतर्गत अतिरिक्त चौथी ऑनलाईन प्रवेश वाटप फेरी राबविणे व त्यानुसार सुधारीत वेळापत्रक निश्चित करणेबाबत.**

संदर्भः- १. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. रासाप्रपक / कृषीप्र-१३२१ / शै.व. २१-२२ / ३३१९ दि.३१/१२/२०२१
२. महासंचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे पत्र जा.क्र. मकृप/ शिक्षण-२/१३२१/३९, दि. ५/१/२०२२

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. संदर्भ क्र. १ येथील परिपत्रकान्वये दि. ४ जानेवारी,२०२२ रोजी चौथी ऑनलाईन प्रवेश वाटप यादी प्रसिध्द करावयाची होती. मात्र काही तांत्रिक कारणास्तव सदरची प्रवेश वाटप यादी दि. ५ जानेवारी,२०२२ रोजी दुपारी १२.३० वाजता प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

राज्यात सध्या कोराना साथरोगाची वाढती स्थिती विचारात घेऊन जागेवरील प्रवेश फेरीच्यावेळी उपस्थितांची संख्या कमी असावी, या दृष्टिकोनातून जागेवरील प्रवेश फेरीचा कालावधी वाढविण्याचा प्रस्ताव संदर्भ क्र. २ अन्वये प्राप्त झाला होता.

वरील बाबी विचारात घेऊन चौथी ऑनलाईन प्रवेश वाटप फेरीच्या रिपोर्टिंग कालावधी आणि त्यापुढील प्रवेश प्रक्रियेचे सुधारीत वेळापत्रक खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कार्यक्रम | सध्याचा दिनांक | सुधारीत दिनांक |
|---|---|---|---|
| १ | चौथ्या ऑनलाईन प्रवेश वाटप फेरीद्वारे प्रवेशाचे वाटप झालेल्या उमेदवारांनी संबंधित महाविद्यालयात उपस्थित राहून मूळ कागदपत्रे व आवश्यक ते शुल्क भरण्याचा कालावधी. | ०५/०१/२०२२ ते ०६/०१/२०२२ | ०५/०१/२०२२ ते ०७/०१/२०२२ |

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>कार्यक्रम</th><th>सध्याचा दिनांक</th><th>सुधारीत दिनांक</th></tr>
<tr><td>२</td><td>‘जागेवरील प्रवेश फेरी’साठी रिक्त जागांच्या तपशिलाची प्रसिध्दी</td><td>०८/०१/२०२२</td><td>०९/०१/२०२२</td></tr>
<tr><td>३</td><td>रिक्त जागांकरिता ‘जागेवर प्रवेश फेरी’ (प्रवेश माहिती पुस्तिकेतील परिशिष्ट ‘जी’ मध्ये नमूद करण्यात आलेल्या ‘जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रा’वर व सोबतच्या परिशिष्टातील कार्यपध्दतीनुसार)
<table>
<tr><th>दिनांक</th><th>अंतिम गुणवत्ता यादीतील पर्सेंटाईल (इतर अधिभारासह)</th></tr>
<tr><td>११/०१/२०२२</td><td>९० व त्यापेक्षा अधिक</td></tr>
<tr><td>१२/०१/२०२२</td><td>८० व त्यापेक्षा अधिक</td></tr>
<tr><td>१३/०१/२०२२</td><td>७० व त्यापेक्षा अधिक</td></tr>
<tr><td>१४/०१/२०२२</td><td>६० व त्यापेक्षा अधिक</td></tr>
<tr><td>१५/०१/२०२२</td><td rowspan="2">सर्व पात्र उमेदवार (जागांच्या रूपांतरासह)</td></tr>
<tr><td>१६/०१/२०२२</td></tr>
</table>
</td><td>१०/०१/२०२२ ते १३/०१/२०२२</td><td>११/०१/२०२२ ते १६/०१/२०२२</td></tr>
<tr><td rowspan="5">४</td><td>संस्थास्तरीय कोटयातील जागा भरण्याचे वेळापत्रक</td><td></td><td></td></tr>
<tr><td>(i) संबंधित संस्था / महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर महाविद्यालयनिहाय संस्थास्तरीय उपलब्ध जागांची प्रसिध्दी</td><td>११/०१/२०२२</td><td>१२/०१/२०२२</td></tr>
<tr><td>(ii) संबंधित संस्था / महाविद्यालयाकडे व्यक्तीशः प्रवेशाकरिता अर्ज दाखल करण्याचा कालावधी (अर्जकर्ता उमेदवार अंतिम गुणवत्ता यादीतील असावा)</td><td>१३/०१/२०२२ व १४/०१/२०२२ (सायं. ६.३० पर्यंत)</td><td>१५/०१/२०२२ ते १७/०१/२०२२ (सायं. ६.३० पर्यंत)</td></tr>
<tr><td>(iii) संबंधित संस्थेच्या / महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर व सूचना फलकावर गुणवत्ता यादी / निवड यादीची प्रसिध्दी.</td><td>१५/०१/२०२२ (सायं. ६.३० पर्यंत)</td><td>१८/०१/२०२२ (सायं. ६.३० पर्यंत)</td></tr>
<tr><td>(iv) निवड यादीतील उमेदवारांनी प्रवेश घेण्यासाठी, संबंधित संस्था / महाविद्यालयाकडे मूळ कागदपत्रे व आवश्यक त्या शुल्काच्या धनाकर्षासह उपस्थित राहण्याचा कालावधी</td><td>१७/०१/२०२२ ते १९/०१/२०२२ (सायं. ६.३० पर्यंत)</td><td>२०/०१/२०२२ ते २२/०१/२०२२ (सायं. ६.३० पर्यंत)</td></tr>
</table>

| अ. क्र. | कार्यक्रम | सध्याचा दिनांक | सुधारीत दिनांक |
|---|---|---|---|
| | (५) निवड यादीतील उमेदवार विहित कालावधीमध्ये उपस्थित नसल्यास, रिक्त असणाऱ्या जागा वरील क्र. (३) येथील गुणवत्ता यादीतील उमेदवारांमधून गुणवत्तेने भरण्याचा कालावधी. तसेच जागा स्वीकृती शुल्क रु.१०००/- प्रती विद्यार्थी लॉगइनद्वारे राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या खात्यात जमा करण्याचा कालावधी. | २१/०१/२०२२ ते २४/०१/२०२२ | २४/०१/२०२२ ते २७/०१/२०२२ |
| ५ | वर्ग सुरु होण्याचा दिनांक | १०/०१/२०२२ | १०/०१/२०२२ |
| ६ | प्रवेश प्रक्रियेसाठीचा अंतिम दिनांक | ३१/०१/२०२२ | ३१/०१/२०२२ |

टिपः- जागेवरील प्रवेश फेरी तसेच संस्थात्मक कोटयाद्वारे प्रवेश घेतलेल्या उमेदवारांना शिष्यवृत्ती अनुज्ञेय असणार नाही.

(रविंद्र जगताप.)
आयुक्त,
राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष

प्रत माहितीसाठीः-

महासंचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, १३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे

<u>**सोबतचे परिशिष्ट**</u>

## जागेवर प्रवेश फेरीची (Spot Admission) कार्यपध्दती

जागेवरील प्रवेश फेरीपूर्वी राबविण्यात आलेल्या प्रवेश फे-यांद्वारे प्रवेश मिळालेल्या उमेदवारांनी नोंदणी न केल्याने अथवा इतर कारणाने जागा रिक्त असल्यास तसेच वाढीव जागांसाठी दि. ११ ते १६/०१/२०२२ या कालावधीत जागेवरील प्रवेश प्रक्रिया केद्रांवर (Spot Admission Process Center) खालील कार्यपध्दतीने जागेवर प्रवेश फेरी (Spot Admission Round) राबविण्यात येईल.

यापूर्वी राबविण्यात आलेल्या प्रत्येक प्रवेश फेरीतील अंतिम गुणवत्ताविषयक प्रवर्गनिहाय (Categorywise Last Merit) तपशील व अद्ययावत रिक्त जागांचा प्रवर्गनिहाय तपशील संकेतस्थळावर दि. ०९/०१/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात येईल.

**राज्यस्तरीय / विद्यापीठस्तरीय गुणवत्ता यादीत समाविष्ट असलेले आणि चालू शैक्षणिक वर्षाच्या पदवी प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेशित नसलेले** (not admitted) **उमेदवार जागेवर प्रवेश फेरीकरिता पात्र असतील.** अशा पात्र उमेदवारांनी तसेच जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रांनी खालील बाबी विचारात घ्याव्यात.

(१) जागेवरील प्रवेश फेरी फक्त ‘जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रां’वर राबविण्यात येईल. कायमस्वरूपी विना अनुदान तत्वावरील महाविद्यालयांच्या ठिकाणी जागेवरील प्रवेश फेरी राबविण्यात येणार नाही. ‘जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रां’वर ज्या ज्या महाविद्यालयांची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे, त्याबाबतचा प्रवेश प्रक्रिया केंद्रनिहाय तपशील प्रवेश माहिती पुस्तिकेतील परिशिष्ट **‘एच’** मध्ये देण्यात आला आहे.

(२) संकेतस्थळावरील रिक्त जागांचा तपशील विचारात घेऊन उमेदवारांना ज्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे, त्या महाविद्यालयाशी संबंधित ‘जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रां’वर दि.११ ते १६/०१/२०२२ **या कालावधीत सकाळी ९.०० ते ११.०० वाजेपर्यंत** आवश्यक ती सर्व मूळ कागदपत्रे व शुल्कासह उमेदवारांनी उपस्थित राहावे. खाली दर्शविलेल्या गुणवत्तेप्रमाणे प्रवेश प्रक्रिया केंद्रावर प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येईल.

| **दिनांक** | **अंतिम गुणवत्ता यादीतील पर्सेंटाईल (इतर अधिभारासह)** |
|---|---|
| ११/०१/२०२२ | ९० व त्यापेक्षा अधिक |
| १२/०१/२०२२ | ८० व त्यापेक्षा अधिक |
| १३/०१/२०२२ | ७० व त्यापेक्षा अधिक |
| १४/०१/२०२२ | ६० व त्यापेक्षा अधिक |
| १५/०१/२०२२ | सर्व पात्र उमेदवार (जागांच्या रूपांतरासह) |
| १६/०१/२०२२ | |

(३) ‘जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रां’नी सकाळी ९.०० ते ११.०० या वेळेत त्यांच्याकडे उपस्थित असलेल्या उमेदवारांची संगणकावर नोंद घ्यावी. यानंतर उपस्थित असलेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करून संबंधित ‘जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रां’स दोन तासाच्या कालावधीत म्हणजेच दुपारी १.३० पर्यंत पुरविण्यात येईल. प्रत्येक दिवसाची स्वतंत्र गुणवत्ता यादी असेल. ही गुणवत्ता यादी फक्त त्याच दिवसासाठी ग्राह्य असेल.

(४) वरीलप्रमाणे पात्र उमेदवारांचा गुणानुक्रमे विचार करून रिक्त जागांसाठी प्रवेश देण्यात यावेत. **आरक्षित प्रवर्गातील रिक्त जागांसाठी संबंधित प्रवर्गाच्या उमेदवारांनाच प्राधान्यक्रमाने प्रवेश देण्यात यावेत.** संबंधित आरक्षित प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध नसल्यास, शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र.मकृवि-२०१०/प्र.क्र.१५५/७अे, दि.२०/१०/२०११ मधील परिशिष्ट २ येथील प्रवेश कार्यपध्दतीनुसार अशा रिक्त जागांवर 'जागेवर प्रवेश फेरीच्या' (Spot Admission Round) शेवटच्या दोन दिवशी म्हणजेच **दि.१५ व १६/०१/२०२२ रोजी** उपस्थित असलेल्या इतर उमेदवारांना गुणानुक्रमाने प्रवेश देण्यात यावेत. **मात्र कोणत्याही परिस्थितीत आरक्षित जागांवर प्रवेश मिळाला नाही, अशी तक्रार आरक्षित प्रवर्गाच्या उमेदवारांकडून कोणत्याही परिस्थितीत येणार नाही, याची दक्षता संबंधित 'जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रां'नी घ्यावी.**

**(५)** 'जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रां'नी दरदिवशी प्रवेश देण्यात आलेल्या प्रवेशांबाबतचा तपशील **राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष व संचालक (शिक्षण), कृषी परिषद यांच्याकडे सायंकाळी ६.०० वाजेपूर्वी ई-मेलद्वारे कळवावा.**

(६) जागेवर प्रवेश फेरीद्वारे प्रवेशाचे वाटप झालेल्या उमेदवारास संबंधित 'जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रां'कडून तात्पुरते 'प्रवेश वाटप पत्र' देण्यात येईल.

(७) 'जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रां'शी संबंधित असलेल्या प्रत्येक महाविद्यालयाच्या एका प्रतिनिधीने संबंधित 'जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रां'त जागेवरील प्रवेश फेरीच्या कालावधीमध्ये उपस्थित रहावे. या प्रतिनिधीने त्यांच्या महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची आवश्यक ती कागदपत्रे व नियमानुसार प्रथम सत्राच्या शुल्काची रक्कम प्राप्त करून घ्यावी. याबाबत उमेदवारास पावती द्यावी.

(८) जागेवरील प्रवेश फेरीच्या कालावधीमध्ये उमेदवाराने प्रवेश रद्द केला असल्यास किंवा इतर कारणामुळे प्रवेश रद्द केल्यास, यामुळे रिक्त झालेली जागा त्याच दिवशी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी, मात्र त्याच दिवशी भरण्यात येऊ नये. अशी रिक्त जागा दुस-या दिवसापासून प्रवेशाकरिता उपलब्ध करून देण्यात यावी. (जागेवरील प्रवेश फेरीच्या शेवटच्या दिवशी रिक्त होणा-या जागांसंदर्भात ही बाब लागू नसेल.)

(९) प्रत्येक उमेदवाराकडून प्राप्त केलेले रू. १०००/- 'जागा स्वीकृती शुल्का' द्वारे जमा झालेली रक्कम, जागेवरील प्रवेश फेरी संपल्यानंतर पाच दिवसांच्या कालावधीत महाविद्यालयाच्या लॉगइनद्वारे सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या खात्यावर जमा करावी. यासाठी प्रत्येक महाविद्यालयाच्या लॉगइनमध्ये रक्कम जमा करण्याची सुविधा (payment gateway) उपलब्ध असेल.